ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

वर्ष : २१ अंक : १९६
मुंबई, ८ ऑगस्ट २००९ (पृष्ठे १२+४)
मूल्य : २.५० रुपये ★★ शहर आवृत्ती
www.epaper.saamana.com

शनिवार

संपादक : बाळ ठाकरे

## अध्यात्म

# स्वामी स्वरूपानंद चैतन्यस्मरण

**पावसचे** परमहंस स्वामी स्वरूपानंद हे अगदी अलीकडच्या वर्षात होऊन गेलेले एक साक्षात्कारी सत्पुरुष नाथ सांप्रदायिक भक्तिसाधनेत आजीवन रमलेले होते. पावससारख्या निसर्गाची देणगी असलेल्या एका लहान गावात राहून त्यांनी अखंड सोऽहम साधना करून सहवासात आलेल्यांना सन्मार्गाना नेत त्यांनी एक प्रकारचे थोर समाजकार्य केले. या अशा थोर साक्षात्कारी सत्पुरुष संताचे १५ ऑगस्ट १९७४ रोजी महानिर्वाण झाले. १५ ऑगस्ट २००९ रोजी त्यांच्या समाधीला ३५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने या लेखामुळे त्यांच्या चैतन्य समाधीला एक पुष्प अर्पण



मागच्या वर्षी वास्तूच्या निमित्ताने रत्नागिरीला गेलो होतो. योगायोग असा की पावसला माझे मित्र नाना शिंदे भेटले व त्यांनी मला पावसच्या श्री स्वामी स्वरूपानंदांच्या मठात घेऊन गेले. याअगोदर मी त्या मठात बऱ्याचवेळा गेलो होतो. तेथे गेल्यावर उच्च चैतन्यशक्तीच्या लहरी मला सारख्या खेचून घेत असत. माझ्या मनात नेहमी विचार यायचे की चैतन्य, ऊर्जा व शक्ती येथे अस्तित्वात असेलच. नाना शिंदे यांनी मठाचे ट्रस्टी देसाईकाकांची ओळख करून दिली. नाना शिंदे यांना माझ्याकडे असलेल्या RFL नावाचे मॅग्नेटिक रिझोनन्स मोजण्याच्या यंत्राबद्दल सांगितले. त्या यंत्राद्वारे मठातील Energy चे मोजमाप करता येईल. हिंदुस्थानात एनर्जीला प्राण किंवा शक्ती म्हणतात. चायनामध्ये या एनर्जीला ची असे म्हणतात व सायन्समध्ये यास स्केलर एनर्जी किंवा लाइफ फोर्स असे संबोधतात. स्केलर एनर्जीमध्ये दोन प्रकारची एनर्जी असते एक चांगली व दुसरी विघातक. चांगल्या एनर्जीमध्ये ऑटोमिक एनर्जीद्वारा आपण इलेक्ट्रिसिटी तयार करतो. उदा. तारापूर पॉवर प्लाण्ट, मुंबई व विघातक एनर्जीपासून आपण अणुबॉम्ब तयार करतो.

आपण वेगवेगळ्या पद्धतीने तीन प्रकारची एनर्जी वापरतो. १) ही एनर्जी चांगली व वाईटदेखील असते. हॉस्पिटलमध्ये या एनर्जीचा उपयोग एक ठराविक व्होल्टेज वापरून रुग्णांना बरे करण्यासाठी वापरतात. परंतु जास्त प्रमाणात Voltage वापरून इलेक्ट्रिक चेअरद्वारे गुन्हेगार लोकांना बोलते करण्यासाठीदेखील वापरतात.

(२) मॅग्नेटिक एनर्जी : मानसिक आजार किंवा शारीरिक आजार बरे करण्यासाठी या एनर्जीचा वापर करता येतो. इलेक्ट्रोस्टॅटिक एनर्जीचा काहीवेळा आपण अनुभव घेतो उदा. ज्या वेळेला तुम्ही टीव्हीच्या जवळ उभे राहता तेव्हा हातावरील केस ताठ होतात.

३) **फार इन्फ्रारेड एनर्जी :** सूर्यापासून मिळणाऱ्या एनर्जीमुळे आपण जगू शकतो. सूर्याच्या किरणांपासून आपल्या शरीरामध्ये व्हिटॅमिन डी व कॅल्शियम तयार होते. सूर्याशिवाय आपले जीवन जगणे अशक्यप्राय गोष्ट आहे. उदा. साऊथ अमेरिकमध्ये पिग्मीज नावाची एक अशी जमात आहे ज्यांची उंची फक्त चार ते पाच फूट वाढते, कारण सूर्यप्रकाश तियपर्यंत पोहोचू शकत नाही, परंतु जास्त सूर्यकिरणाने आपली त्वचा जळू शकते आणि कॅन्सरदेखील होऊ शकतो.



या सर्व वेगवेगळ्या प्रकारची एनर्जी रिझॉल्यूशन फिल्ड इमेज या उपकरणाद्वारे मानवाच्या शरीरातील ४० बिंदूचा तसेच शरीराबाहेरील वलयांची फ्रिक्वेन्सी मोजमाप करता येते. तसेच याचा उपयोग वास्तूची एनर्जी मोजण्यासाठीदेखील करू शकतो. मात्र पद्धत वेगळी आहे. पाश्चात्त्य देशात या सर्व प्रकारची एनर्जी तसेच अध्यात्म, हिंदूंच्या सर्व हिलींग मेथडचा शास्त्राच्या कसोटीवर संशोधन होऊन वेगवेगळ्या उपकरणांचा शोध लावला जातो. परंतु आपल्या हिंदुस्थानात अजूनही हिंदू संस्कृतीच्या नावाने बोटे मोडली जातात याचा मला खेद वाटतो. या आरएफआय उपकरणाद्वारे मी प्रथम श्री स्वरूपानंद स्वामींच्या गाभाऱ्यातील फ्रिक्वेन्सी मोजली त्यावेळेला ती ८५० MHz मिळाली. याचाच अर्थ असा की याचा रंग बर्गंडी असून इथे एनर्जीची वाढ तसेच नवचैतन्याची वाढ दर्शविते. त्यानंतर त्यांच्या पादुकांची फ्रिक्वेन्सी १० MHz मिळाली. याचा रंग निळा असून अतिशय गतिमान, निरोगी तसेच स्वच्छ वातावरणाची निर्मिती आढळते. त्यानंतर आम्ही समाधी मंदिरात खाली गेलो असता तेथील फ्रिक्वेन्सी ० ० ० र्हे मिळाली याचाच अर्थ तेथे कुठल्याही प्रकारचे इलेक्ट्रो मॅग्नेटिक फिल्ड नसल्यामुळे तेथे साक्षात चैतन्य आविष्काराचा चमत्कार आहे. असे मी मानतो.

✍ तुषार यशवंत सावडावकर
बी. ए., एम. बी. ए.
वास्तुतज्ज्ञ, नॅचरो थेरपिस्ट
९८९२१५९७१५